महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

# संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी - बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४/ टोल फ्री क्र. १८०० २२ २०१९
Website-https://mahaawaas.com
Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./SMURH/IT/बैठक/२०२३/७४८

दि: १३/०६/२०२३

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या आढावा बैठकीस उपस्थित राहणेबाबत...**
संदर्भ :- मा. श्री. शैलेश कुमार, सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. ८ जून, २०२३ रोजीच्या बैठकीतील सूचना.

मा. श्री. शैलेश कुमार, सचिव, ग्रामीण गृहनिर्माण, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि.०८/०६/२०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या खालील विषयांवर आढावा घेण्यासाठी, उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व गट विकास अधिकारी (पंचायत समिती) या सर्व अधिकारी यांच्या विभागीय बैठका आयोजित करण्यात येत आहेत.

**सदर बैठकीसाठी विषय सूची खालील प्रमाणे-**

१. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे.
२. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत पहिला व दुसरा हप्ता वितरीत करणे.
३. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत दि. १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत घरकुले पूर्ण करण्यासाठी नियोजन करणे.

**विभागनिहाय आढावा बैठकांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे-**

| अ.क्र. | विभागाचे नाव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | कोंकण, पुणे व नाशिक | दि.१४.०६.२०२३ | दुपारी ०२.०० ते सायं. ०५.०० वा. पर्यंत |
| २ | औरंगाबाद, अमरावती व नागपूर | दि.१५.०६.२०२३ | सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वा. पर्यंत |

तरी आपण सर्व संबंधितांना या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी सूचित करावे, ही विनंती.

सदर विभागीय बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात येणार असून, याकरिता आवश्यक लिंक आपणांस उपलब्ध करुन देण्यात येईल.

(डॉ.राजाराम दिघे)
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

प्रतः

१. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.
५. गट विकास अधिकारी (पंचायत समिती), जिल्हा परिषद, (सर्व) यांना माहिती व उपस्थित राहण्यासाठी.